सामाजिक वनीकरण करतेवेळी



एल.इ.डी.लाईटचे महत्व गावच्या सरपंचाला सांगितले .



# कुमठा ठरले 'एलईडी'ने उजळणारे मराठवाड्यातील पहिले गाव...!

राज्य सरकारने दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राबविलेल्या जलयुक्त शिवार अभियानात कुमठ्याची निवड झाली नव्हती. तरीही धैर्य न हारता कुमठा गावाने जलयुक्त शिवार अभियान गावात राबविण्याचा निर्धार केला. भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आ. गोविंद केंद्रे यांच्या दूरदृष्टीतून तालुक्यातील सर्वात लांब पल्ल्याचे ७ किमी लांबीचे काम कुमठा येथे जलयुक्तच्या माध्यमातून करण्यात आले. या कामाची दखल जिल्हाधिकारी पांडुरंग पोले यांनी घेऊन या कामाची प्रत्यक्ष पाहणी करत कुमठ्याचा आदर्श इतर गावांनी घ्यावा, असे आवाहन करून कामाचे कौतुक केले होते. तर तालुक्यातील इतर गावांनीसुद्धा जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या आवाहनाला मान्यता देत कुमठा जलयुक्त शिवार यशस्वीरीत्या राबवल्याचे पाहून इतर गावांनी हे जलयुक्त शिवार अभियान राबविण्यासाठी उडी घेतली.

गोविंद केंद्रे यांची दूरदृष्टी आणि उदगीरचे उपविभागीय अधिकारी डॉ. विकास खरात यांनी अभियानासाठी घातलेले लक्ष निश्चितच संपूर्ण तालुक्यातील शिवार जलमय केल्याशिवार राहणार नाही, असे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे. कुमठा ग्रामपंचायतीने यानंतर लगेचच हाती घेतलेला एलईडी लाईट प्रोजेक्टसुद्धा यशस्वी झाला. विशेष म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात यापूर्वी एखाददुसऱ्या गावात एलईडीचा प्रकल्प राबविण्यात आला. मराठवाड्यात एलईडी वापरणारे कुमठा हे पहिले गाव ठरले आहे. हे पाहून इतर गावांचे प्रमुख गावकर्ते कुमठ्याचा दौरा काढून पाहणी करत माहिती घेत आहेत. तर गावातील रस्त्यावर चालताना किंवा चौकात गेल्यावर शहरात आल्याचा भास होतो, असे मत कुमठा गावातील नागरिकांतून व्यक्त केले जात आहे.

"

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी आणि अमृतच्या माध्यमातून शहरात विकासाची संधी देत असतानाच ग्रामीण भागात सुद्धा स्मार्ट व्हिलेजच्या माध्यमातून गावांना सुंदर करण्यासाठी सरकारने योग्य पावले उचलली आहेत आणि याच संधीचा फायदा राज्यातील ग्रामपंचायतीने घेतला पाहिजे आणि आपले गाव सुंदर, विकसित केले गेले पाहिजे.

**माजी आमदार गोविंद केंद्रे,**
प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा

एन.एस.एस. कॅम्प मध्ये मार्गदर्शन करतेवेळी.




लायन्स कल्ब गंगाखेड यांच्या वतीने ५७ रुग्णांची नेत्र तपासणी व यशस्वी शस्त्रक्रिया

१०/१०/२०१७



# गंगाखेडात लॉयन्स क्लबच्या नेत्र चिकित्सा शिबीरास प्रतिसाद;५७ रुग्णांची तपासणी

**प्रतिनिधी**
**गंगाखेड, दि.१० सप्टेंबर**

लायन्स क्लब गंगाखेड व लॉयन्स नेत्र रूग्णालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने गीता मंडळ येथे नेत्र चिकित्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी आरोग्य अधिकारी डॉ.रमेश खंदारे यांची प्रमुख तर व्यासपीठावर अध्यक्ष प्रा.मुंजाजी चोरघडे, नेत्र तज्ञ डॉ.डी.आर. लटपटे, प्रा.बालाजी ढाकणे, सचिव प्रा.डॉ. अशोक केंद्रे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर राजुरकर, शिवसेना तालुका प्रमुख विष्णू मुरकटे, केशवराव देशमुख, अतुल तुपकर आदी उपस्थित होते. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी हे शिबीर घेण्यात येते. गणपती उत्सवामुळे आज हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. लायन्स क्लब गंगाखेड व लॉयन्स नेत्र रूग्णालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने नियमित शिबिराचे आयोजन केले जाते. आजचे हे तिसरे शिबीर होते. आजच्या शिबीरात नेत्र तज्ञ डॉ.डी.आर.लटपटे यांनी नेत्र रुग्णांची तपासणी केली. ५७ रुग्णांनी शिबिराचा लाभ घेतला. यात १५ मोतीबींदू रूग्णांना नांदेडला पाठवण्यात आले. तेथे त्यांच्यावर लायन्स रूग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असून या अगोदर २५ रूग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. आजचे १५ धरून गंगाखेडच्या ४० रुग्णावर लॉयन्सच्या वतीने मोफत शस्त्रक्रियाचा आकडा होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लॉयन्स परिवारा बरोबरच भूषण भडके, विनोद खरात, गोविंद चोरघडे, बालाजी रमतापुरे व प्रल्हाद साळवे यांनी परिश्रम घेतले.

संत जांबाई साहित्यसमेलन दिंडी



बेवारस व स्मशानामध्ये काम करणाऱ्या लोकांना थंडीच्या दिवसामध्ये काम्बल वाटप





लोकमत

# गंगाखेड येथे लायन्स क्लबच्या वतीने धान्य किटचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**गंगाखेड** : लॉकडाऊनच्या काळात गोरगरिबांची उपासमार होऊ नये, म्हणून गंगाखेड येथे लायन्स क्लबच्या वतीने गरजू व्यक्तींना आठ दिवस पुरेल एवढे धान्य नुकतेच वाटप करण्यात आले.

सामाजिक बांधिलकीतून संचारबंदीच्या काळात लायन्स क्लबच्या वतीने शहरातील गरजू व्यक्तींना जेवणाचे डबेही पुरविले जात आहेत. ६ एप्रिल रोजी दत्त मंदिर परिसर, केशवनगर परिसर, ईसाद रोडवर पाल टाकून गोरगरिबांना अन्नधान्य वाटप करण्यात आले. यात पाच किलो गव्हाचे पीठ, पाच किलो तांदूळ, तेलाचे एक पाकीट, एक किलो डाळ, चहापत्ती, मीठ, मिरची पावडर, हळद पावडर, साबण असे आठ दिवस पुरेल एवढे धान्य वितरित करण्यात आले.

यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी बलराज लांजिले, तहसीलदार स्वरुप कंकाळ, गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर, लायन्स क्लबचे अध्यक्ष रामेश्वर तापडिया, किराणा असोसिएशनचे अध्यक्ष दगडू सोमाणी, प्रा. डॉ. बालाजी ढाकणे, केशवराव देशमुख, पुरुषोत्तम भंडारी, विष्णूकांत जेठुरे, अशोक कवठेकर, संजय धुळे, प्रा. राजीव आहेरकर, प्रा. अशोक केंद्रे, विलासराव जंगले, संजय तापडिया, प्रा. पी. आर. सुर्वे, प्रभाकर देशमुख, अतुल गंजेवार, प्रदीप शशीकांत, देवीदास गडम, विशाल सुराणा, माजी सैनिक विश्वनाथ सातपुते, रमेश मुंडे, लक्ष्मणराव भोसले, महावीर सुराणा, आनंद भंडारी, गोपाल तापडिया, कौस्तुभ तापडिया, अभिषेक तापडिया आदींसह नागरिकांची उपस्थिती होती.

Hello Parbhani
Page No. 3 Apr 08, 2020
Powered by: erelego.com

संत जनाबाई मंदीर समितीच्यावतीने माझा सत्कार





# स्मशानात रंगली अंनिसची काव्यमैफल!

गंगाखेड / प्रतिनिधि

आजच्या आधुनिक समाजातही अंधश्रध्दा ठेवली जाते. या अंधश्रध्देला मूठमाती देण्यासाठी तसेच स्मशानासंदर्भात असलेले गैरसमज, भीती दूर करण्यासाठी रुक्ष व दुर्लक्षित स्मशानभूमीत गंगाखेड अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्यावतीने ऐन अमावस्येच्या दिवशी काव्यमैफिल आयोजित करण्यात आली. या काव्य मैफिलीत शब्द व सुरांनी सामाजिक जाणीवांची भावना गुंफली.

गंगाखेड तालुका अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या वतीने अमावस्येच्या निमित्ताने 'स्मशानातील काव्य महफिल'चे आयोजन सोमवार २४ जुलै रोजी गोदातटावरील स्मशानभूमीत करण्यात आले होते. या काव्य मैफिलीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक माजी प्राचार्य डॉ.दिनानाथ फुलवाडकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ कवी देवराव रायभोळे, लायन्सचे अध्यक्ष प्रा.मुंजाजी चोरघडे, प्रा.डॉ.धुमाळ आदी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाची सुरुवात अशुभ मानल्या जाणाऱ्या काळ्या बाहुलीचे दहन करून करण्यात आली.

या काव्य मैफिलीत कवी आत्माराम जाधव, प्रा.डॉ. संतोष हंकारे, यशवंत मस्के, प्रा.डॉ.एम. डी.इंगोले, प्रा.अशोक केंद्रे, वैजनाथ मोरताटे, शिवशंकर डोईजड, रोहिदास लांडगे, सूर्यमाला मोतीपवळे, गोपी मुंढे आदींनी आपल्या सामाजिक आशय असलेल्या कवितांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमास प्रकाश शिंगाडे, पिराजी कांबळे, ॲड. मिलिंद क्षीरसागर, ॲड.आर. आर.गायकवाड, संजय मस्के, राजेश भिसे, राहुल साबणे, माणिक जोंधळे, नवनाथ साळवे, रमेश सूर्यवंशी, आशा रेघाटे, गणेश कांबळे, प्रा.संदीप थोरे, राजू समुद्रे, गुणवंत कांबळे यांच्यासह अंनिसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी स्मशानमधील सेवक गंगाधर शान्कुवाड व त्यांच्या पत्नी गंगुबाई शंकूवाढ यांचा अंनिसच्या वतीने सत्कार करण्यात आला. राहुल साबणे यांनी चळवळीचे गीत सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पिराजी कांबळे यांनी केले तर आभार ॲड. मिलिंद क्षीरसागर यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी नादबिंदू कला अकादमीचे विद्यार्थी व सदस्यांनी पुढाकार घेतला.



संपर्क प्रमुख सुनिल बावळे याच्या

लागले.

# अंनिसच्या काव्य महफिलीने स्मशानात सूर शब्द गुंफिले

गंगाखेड : प्रतिनिधी

गंगाखेड तालुका अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने अमावसेच्या निमित्ताने 'स्मशानातील काव्य महफिल'चे आयोजन दि. २४ जुलै रोजी गोदातटावरील स्मशानभूमीत करण्यात आले होते.

सविस्तर माहिती अशी कि, या काव्य म्हिफलीच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ साहित्यिक माजी प्राचार्य डॉ. दिनानाथ फुलवाडकर तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ कवी देवराव दाजीबा रायभोळे, लायन्सचे अध्यक्ष प्रा. मुंजाजी चोरघडे, प्रा. डॉ. धुमाळ आदि उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाची सुरुवात अशुभ मानल्या जाणाऱ्या काळ्या बाहुलीचे दहन करून करण्यात आले. या काव्य महफिलीस आत्माराम जाधव, प्रा.डॉ. संतोष हंकारे, यशवंत मस्के, प्रा. डॉ. एम.डी.इंगोले, प्रा अशोक केंद्रे, वैजनाथ मोरताटे, शिवशंकर डोईजड, रोहिदास लांडगे, सुर्यामालाताई मोतीपवळे, गोपी मुंढे आदींनी आपल्या सामाजिक आशय असलेल्या कवितांचे सादरीकरण केले. रुक्ष व दुर्लक्षित स्मशानात अंनिसने घेतलेल्या काव्य महफिल या कार्यक्रमाने शब्द व सुरांनी सामाजिक जाणीवेची गुंफण विणली गेली.


तिसऱ्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

कु. सृष्टी

शुभेच्छुक
गौळण कातकडे (आई),
कुंडलीक कातकडे(आजोबा),
सोनाली कातकडे(मम्मी),
संजय कातकडे (पप्पा),
प्रीती कातकडे (काकू),
राजू कातकडे (काका), कु. जयश
व समस्त कातकडे परिवार गंगाखेड

आर्य दवाखाना
डॉ. राज (आयुवर्दीक उपचार)
मिले हर गुरुवार
गुप्त एवं सैक्स रोगी मिले
शराब छुडाये, शराबी को बीना बताये
पता-जिंतूर रोड, गणपती चौक, जाधव गॅस एजन्सी के बाजु मे परभणी
सिर्फ ७ दिनो मे ताकत प्राप्त करे
बचपन की नादानी से परेशान एकबार आवश्य मिले
मो.न. ८४०८८८७०५२


१०वी च्या वर्गाचेटु गेटटूगेदर (१९८८-२०१९)



सर्व कर्मचारी यांच्या एक दिवसाच्या  वेतनाचा धनादेश Covid-19 उपविभागीय अधिकारी गंगाखेड यांच्याकडे देतेवेळी




१२ जनेवारी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती



सर्वरोग तपासणी शिबिरामध्ये सहभाग





# 'रासेयोच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीचे कार्य'

लोकमत न्यूज नेटवर्क

गंगाखेड : राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून व्यक्तीमत्व विकास साधण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होते. तसेच या माध्यमातून राष्ट्र उभारणीचे कार्य होत असल्याचे प्रतिपादन तहसीलदार जीवराज डापकर यांनी केले.

तालुक्यातील टोकलवाडी येथे कै.सौ.शेषाबाई सीताराम मुंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्‌घाटन नुकतेच झाले. याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बालाजी ढोकणे तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक तुकाराम तांदळे, सरपंच दशरथ तांदळे, पोलीस पाटील बालासाहेब तांदळे, बळीराम नागरगोजे आदींची उपस्थिती होती. डॉ. अविनाश खोकले यांनी प्रास्ताविक केले.

प्रा.डॉ.अशोक केंद्रे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.नामदेव लटपटे यांनी आभार मानले.

पुरस्कार व प्रशस्ती पत्र .



Reg.No.Mah-154/97

एकता सेवाभावी संस्था,महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : महाराष्ट्र मिडिया कार्यालय, गालीब नगर, दर्गा रोड,परभणी - ४३१ ४०१ (महाराष्ट्र) मो.7721088557

## मानपत्र

सोमवार दि.१४ मे २०१८

महाराष्ट्र ही संताची,विचारवंतांची,समतेची शिकवण देणारी पावन भूमी.अद्‌भुत हिऱ्यांना जन्म देणारी जन्मदात्री.आधुनिक समाज निर्मीतीत मानवी मुल्यांची जोपासना करीत अखंड भारत,एकसंघ समाज,आदर्श राष्ट्रनिर्मीतीसाठी आपण आपल्या सेवाक्षेत्रात सदैव नवनिर्मीतीच्या ध्येयाने प्रेरित होऊन प्रामाणिक पणे परिश्रम घेत आहात.आपल्या सामान्य कर्तृत्वातून,कार्यातून गौरवयुक्त परंपरेतील शान राखली आपल्या या सद्‌गुण साधनेचा आम्हा सार्थ अभिमान वाटतो. आपले कार्य राष्ट्र,राज्य,विभाग,गाव पातळीवर सर्वार्थाने भूषणावह भूषणच होय.

सन्माननिय ........प्रा.डॉ. अशोक भानुदास केंद्रे........

आपल्या........शिक्षण........क्षेत्रातील सहकार्याचा सत्काररुपी गौरव करताना स्वतःही गौरवांकित समजतो. हे मानपत्र प्रदान करतांना आम्हांस मनस्वी आनंद होत आहे.आमच्या या भावनांचा स्विकार व्हावा. संस्थेतर्फे आपल्या पुढील कार्यास हार्दीक शुभेच्छा...!


धन्यवाद....!

प्रा.टी.पी.मुंडे
(प्रांतअध्यक्ष)

प्रा.अरूण पडघन
अध्यक्ष पुरस्कार निवड समिती

अजमत खान
संस्थापक अध्यक्ष,एकता सेवाभावी संस्था,महाराष्ट्र

एकता



एकता सेवाभावी संस्था,महाराष्ट्र

## मानपत्र

### महात्मा गांधी सेवा गौरव पुरस्कार

मा. प्रा. डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे.

महाराष्ट्र ही पावन भूमी, समतेचा वारसा सांगणारी, अद्‌भूत हिऱ्यांना जन्म देणारी जन्मदात्री होय. आधुनिक समाजामध्ये मानवतेची अमूल्य मानवीय मूल्यांची जपणूक अखंड भारत, एकसंघ समाज व्यवस्था, आदर्श राष्ट्रनिर्मितीसाठी महात्माजींनी सत्य, अहिंसा, प्रेमाच्या आधारे स्वतंत्र भारताची उभारणी करत भारतीय माणसाच्या मनात भयमुक्तीचा विचार रुजविला. ज्ञान,ध्यान, पुजा, विवेक, आनंद याला आध्यात्माची जोड देत अखिल मानवी कल्याणाचा मूलमंत्र बापूंनी संपूर्ण जनाला दिला. अहिंसेने जग जिंकता येते, हा कृतीशील विचार राष्ट्रपिता म्हणून महात्माजींनी आपल्या अनुभवातून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे व्यक्तीत्व संपूर्ण मानव जातीसाठी आदरणीय व आदर्श असे आहे. त्यांच्या या सेवा साधनेचा ध्यास घेणारे आपण आपल्या क्षेत्रामध्ये सदैव जाणीवपूर्वक जबाबदारीने राष्ट्रनिर्माणाचे कार्य प्रामाणिकपणे निभावत आहात. आपल्या सेवा समर्पणातून प्रामाणिक परिश्रमाला पर्याय नसल्याचे आपण आपल्या कृतीतून जनाला दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

गांधी विचारांचे आपण सर्व उपासक आहात. आज काळाची गरज लक्षात घेता *एकता का नाम महात्मा गांधी* हे आपण सर्वांनी जनाला निक्षून सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आपल्या या निःस्पृह कार्याला एकताचा मानाचा मुजरा...!

आज या शुभदिनी आपणास *महात्मा गांधी सेवा गौरव पुरस्कार* प्रदान करताना मनस्वी आनंद होत आहे. या निमित्ताने भय व भ्रष्टमुक्त पवित्र समाजाची निर्मिती कार्य आपल्या हातून घडावे,ही आशा आणि अपेक्षा...!

मा.श्री.पं.शंकर प्रसाद अग्निहोत्री
( कार्यक्रमाचे अध्यक्ष)

— यांच्या शुभहस्ते —

मा.श्री.किरण कुमार
( सिने अभिनेते)

मा.श्री.अनिल मोरे
( मराठी सिने अभिनेते)

| | | | |
|---|---|---|---|
| इमरान राही | प्रा.अरुण पडघन | अनिल नरेडी | अजमत खान |
| ( स्वागताध्यक्ष) | ( स्वागत कार्याध्यक्ष) | ( विदर्भ अध्यक्ष,एकता) | (संस्थापक, अध्यक्ष) |









लॉयन्स क्लब गंगाखेड टाऊन

शिक्षक सन्मान २०१९

## प्रशस्तीपत्र

श्री / श्रीमती डॉ. प्रा. अशोक केंद्रे

शाळा कै. सौ. शे. सी. मुंडे कला महाविद्यालय, गंगाखेड.

आपण शिक्षक म्हणून कार्य करीत असतांना विद्यार्थ्यांवर केलेले संस्कार, नैतिक मूल्य, देशभक्ती, आदर्श विद्यार्थी घडविण्यासाठी व शिक्षणक्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी आपले अमूल्य योगदान आहे. शिक्षक दिनानिमीत्त, आपल्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल लॉयन्स क्लब गंगाखेड टाऊन आपला सन्मान करीत आहे. करीता प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात येत आहे.

अभिनंदन...

| | | |
|---|---|---|
| लॉ. रामेश्वर नाव्हेकर | लॉ. बालाजी कांदे | लॉ. पुरुषोत्तम भंडारी |
| अध्यक्ष लॉयन्स क्लब गंगाखेड | सचिव लॉयन्स क्लब गंगाखेड | कोषाध्यक्ष लॉयन्स क्लब गंगाखेड |

दिनांक : ५/०९/२०१९